# समिती दर्पण

**फेब्रुवारी २०२६**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात १३०० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# संस्कृती टिकविण्यासाठी वाचन आवश्यक

## मातृभाषेतील पुस्तके वाचण्याचे लेखक भानू काळे यांचे आवाहन

आपली मातृभाषा, संस्कृती टिकवायची असेल, तर दर्जेदार मराठी पुस्तके वाचा, असे आवाहन अंतर्नाद मासिकाचे संपादक, लेखक भानू काळे यांनी केले.

'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत श्री. काळे यांनी समितीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. लतिका गायतोंडे वसतिगृहात झालेल्या या कार्यक्रमाला कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर, ग्रंथालय उपसमितीचे वल्लभ कोल्हटकर, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, कविता हेबाळकर, पर्यवेक्षक नम्रता गजरे आदी उपस्थित होते.

वाचनाचे प्रमाण कमी झाले आहे, याचे शल्य वाटते, असे सांगून भानू काळे म्हणाले, "वाचनामुळे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते, बुद्धीची मशागत होते. मात्र वाचनासाठी पुस्तकाची अचूक निवड करणेही महत्त्वाचे असते. भाषा हा मोठा सांस्कृतिक वारसा आहे. साहित्यातून अनेक गोष्टींचा उलगडा होतो. जीवनातील व्यामिश्रता, गुंतागुंत साहित्य तुमच्यासमोर प्रभावीपणे मांडते. साहित्य जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन देते."

आवडीच्या विषयाचे महिन्यातून एकतरी पुस्तक वाचा. त्यातून जो बोध होईल, तो लिहून काढा, त्यामुळे तुमचे वाचन समृद्ध होईल, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.



कार्यक्रमात शोभा माळी, नम्रता कुंभकर्ण, उत्तम शिवकर, सानिका म्हस्के, समीक्षा लिहिणार या विद्यार्थ्यांनी, तसेच ग्रंथालय समिती सदस्य प्रकाश दीक्षित यांनी भानू काळे यांचे लेख आणि पुस्तकांविषयी अभिप्राय व्यक्त केला. भक्ती काळे हिने सूत्रसंचालन केले.

> समितीचा चोखपणा वाखाणण्याजोगा आहे. अशा संस्था अपवादानेच दिसतात, पण त्यांच्यामुळेच समाजात चांगुलपणा टिकून आहे.
>
> **- भानू काळे,**
> संपादक, 'अंतर्नाद'

# समितीची गुढी गेली सातासमुद्रापार

## 'कमवा व शिका'ला अमेरिकेतील हितचिंतकांची दाद

गुढीपाडवा हा मराठी संस्कृतीतील मोठा सण. मराठी नववर्षाची सुरुवात या दिवशी होते. मराठी माणूस जगाच्या पाठीवर कोठेही असला, तरी त्याची इथल्या मातीशी नाळ कायम असते. त्यामुळे तो हा सण उत्साहाने साजरा करतो. अमेरिकेत राहणाऱ्या समितीच्या हितचिंतकांना यंदा पुण्याच्या मातीचा स्पर्श लाभलेली गुढी उभारण्याची संधी मिळणार आहे, तीही समितीच्या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे.

स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर आखलेल्या समितीच्या उपक्रमांत 'कमवा व शिका' हा एक महत्त्वाचा संस्कार अनिवार्य आहे. यात विद्यार्थी उपयुक्त कामे करून कार्यानुभवाबरोबरच अर्थार्जनही करतात. कामाचे, वेळेचे आणि पैशाचे नियोजन शिकतात व स्वावलंबनाच्या मार्गावर वाटचाल सुरू करतात. ही गुढी याच प्रकल्पातून तयार होऊन ती अमेरिकेतील समितीच्या हितचिंतकांपर्यंत पोहोचणार आहे. अमेरिकेतील समितीचे हितचिंतक अॅन अर्बर मराठी मंडळाचे संस्थापक सदस्य भूषण कुलकर्णी आणि स्वाती कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून, विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थिनींच्या कल्पक उपक्रमातून आणि व्हीएसएस फाउंडेशनच्या माध्यमातून गुढी सातासमुद्रापार पोचली आहे. समितीतील विद्यार्थिनी कमवा व शिका उपक्रमांतर्गत गेल्या तीन वर्षांपासून गुढी तयार करून त्यांची विक्री करीत आहेत. सुबक, सुंदर अशा या गुढ्यांना मागणीही चांगली आहे. अमेरिकेतून सुमारे २०० मराठीजनांनी या गुढीला पसंती देत मागणी नोंदविली होती.



# आर्थिक व वैचारिक योगदान द्यावे

## माजी विद्यार्थ्यांना बाळासाहेब शेलार यांचे आवाहन, ३७ वा स्नेहमेळावा

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थ्यांचा ३७ वा स्नेहमेळावा २२ फेब्रुवारी रोजी झाला. माजी विद्यार्थ्यांनी पुढील पिढीसाठी आर्थिक व वैचारिक योगदान द्यावे, असे आवाहन मेळाव्याचे अध्यक्ष बाळासाहेब शेलार यांनी केले.

आजी विद्यार्थिनींच्या स्वागत गीतानंतर माजी विद्यार्थी जालिंदर शिंदे यांनी समिती गीत सादर केले. माजी विद्यार्थी मंडळाच्या सचिव मनीषा गोसावी यांनी वर्षभरात झालेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. खजिनदार अॅड. देविदास टिळे यांनी आर्थिक अहवाल सादर केला. समितीच्या दहा वसतिगृहांतील दहा आदर्श विद्यार्थी- विद्यार्थिनी व संबंधित पर्यवेक्षकांचा मंडळाच्या सदस्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन मंडळाचे सदस्य निसार चौगुले यांनी केले.

यावेळी समितीचे कार्यकर्ते सुधीर राजगुरू, कर्मचारी शीतल शिंदे, तसेच देणगीदार डॉ. एल. के. गीते यांचा सत्कार करण्यात आला.

### माजी विद्यार्थी मंडळाचे अॅप

माजी विद्यार्थी ज्ञानेश घुगे यांनी विकसित केलेल्या माजी विद्यार्थी मंडळाच्या अॅपचे औपचारिक उद्घाटन समितीचे कायम विश्वस्त तुकाराम गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी समितीच्या विविध योजना तसेच सेक्शन ८ अंतर्गत स्थापन केलेल्या Student's Welfare Association विषयी माहिती दिली. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी समितीच्या योजना, माजी विद्यार्थी मंडळाचा सहभाग आणि अपेक्षा याबाबत मार्गदर्शन केले. समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांचा संदेश यावेळी वाचून दाखविण्यात आला. देणगीदारांच्या यादीचे वाचन भरत कारकर यांनी केले.


समितीची अन्न निधी संकल्पना व पाल्य-पालक योजनेविषयी माहिती दिनकर वैद्य यांनी दिली. प्रमुख पाहुणे विजय शिवतारे, अॅड. सुरेखा पाटील, प्रा. दीपक पवार व संभाजी चवले यांनी मनोगत व्यक्त केले. मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे यांनी माजी विद्यार्थी मंडळाच्या भावी योजनांची माहिती दिली.

पुढील वर्षीच्या माजी विद्यार्थी मेळाव्याची जबाबदारी नाशिक विभाग घेणार असल्याचे माजी विद्यार्थी विश्वास देवकर यांनी जाहीर केले. या मेळाव्यासाठी भोजन व्यवस्था माजी विद्यार्थिनी पल्लवी नायक यांनी केली. सूत्रसंचालन सीए संतोष घारे यांनी केले. आभार पोपट चिकने यांनी मानले.



# इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमध्ये समितीच्या दोन विद्यार्थ्यांना संधी

## शुभम, पार्थ यांनी अनुभवला कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव



नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमध्ये सहभागी होण्याची संधी समितीचे विद्यार्थी शुभम गलांडे व पार्थ शेळके यांना मिळाली. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील देशातील सर्वात मोठ्या आणि व्यापक उपक्रमांपैकी हा एक होता.

या परिषदेमध्ये शंभरहून अधिक देशांतील प्रतिनिधी सहभागी झाले होते. जगभरातील तंत्रज्ञान कंपन्या, स्टार्टअप्स, संशोधक, धोरणकर्ते आणि उद्योगनेते एकत्र आले होते. मुख्य सभागृहात विविध पॅनेल चर्चा आणि सत्रांमधून भारताची एआय दिशा, जागतिक स्पर्धा, उद्योगांतील बदल आणि तंत्रज्ञानाचा सामाजिक परिणाम यांवर चर्चा झाली. शासन, उद्योग आणि नवोपक्रम क्षेत्रातील मान्यवर एकाच मंचावर विचार मांडताना पाहणे, हा मोठा अनुभव होता, असे शुभम व पार्थ यांनी सांगितले.

ते म्हणाले, आमच्यासाठी प्रदर्शन विभाग विशेष आकर्षण ठरला. विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रत्यक्ष वापर कसा होत आहे, हे पाहण्याची संधी मिळाली. कृषी, आरोग्य, उत्पादन, डेटा व्यवस्थापन, ऑटोमेशन अशा अनेक क्षेत्रांतील उपाय प्रत्यक्ष अनुभवता आले. तंत्रज्ञान केवळ संकल्पना नसून प्रत्यक्ष कामात उतरलेले वास्तव आहे, हे स्पष्ट जाणवले.

या परिषदेमुळे आमची विचार करण्याची चौकट अधिक व्यापक झाली. जागतिक स्तरावर तंत्रज्ञान किती वेगाने पुढे जात आहे, भारत या क्षेत्रात किती मोठी झेप घेत आहे आणि भविष्यातील संधी किती व्यापक आहेत, याचा प्रत्यक्ष अनुभव आला, असेही या दोघांनी नमूद केले.

> विद्यार्थी म्हणून अशा जागतिक मंचावर उपस्थित राहणे ही केवळ सहभागाची बाब नव्हती, तर आत्मविश्वास वाढवणारा क्षण होता. विविध देशांतील प्रतिनिधींशी संवाद साधताना जागतिक स्तरावर विचार करण्याची दृष्टी मिळाली. ही संधी आम्हाला विद्यार्थी सहाय्यक समितीमुळे मिळाली. समितीचा विद्यार्थी म्हणून हा अनुभव अभिमानाचा आणि प्रेरणादायी ठरला.
>
> **- शुभम गलांडे, पार्थ शेळके,**
> पी डी कारखानीस वसतिगृह

तयाचा वेलू...

# समितीच्या शिस्तीतून जागतिक नेतृत्वापर्यंत

ग्रामीण भागातील मर्यादित साधनांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावरील नेतृत्वपदापर्यंतचा प्रवास सहज सोपा नसतो. जिद्द, कष्ट, शिस्त आणि योग्य मार्गदर्शन यांच्या बळावर हा प्रवास शक्य होतो. अशीच एक प्रेरणादायी कहाणी आहे सुजाता कोळेकर यांची.

सुजाता कोळेकर या Accenture Japan या जागतिक कीर्तीच्या सॉफ्टवेअर सेवा आणि सल्लागार कंपनीत व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्या टोकियो (जपान) येथे वास्तव्यास आहेत. सुमारे ८ लाखांहून अधिक कर्मचारी असलेल्या या बहुराष्ट्रीय कंपनीत सर्वोच्च व्यवस्थापन स्तरावर काम करणे, हे त्यांच्या प्रदीर्घ परिश्रमांचे आणि नेतृत्वगुणांचे फलित आहे.

सुजाता यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई. त्यांचे आठवीपर्यंतचे शिक्षण तेथे झाले. त्यानंतर दहावीपर्यंतचे शिक्षण रायगड जिल्ह्यातील जोहे (ता. पेण) येथे झाले. या गावात दरवर्षी पुरामुळे तब्बल तीन महिने शाळा बंद राहायची. अशा परिस्थितीत शिक्षण घेणे हेच मोठे आव्हान होते. सुजाता ज्या तांत्रिक शाळेत शिकत होत्या, तेथे आठवीपासून व्यावसायिक शिक्षण दिले जात असे. त्या शाळेत शिकणाऱ्या एकमेव मुलगी त्या होत्या.

सुजाता यांचे वडील शिक्षक, आई गृहिणी. एक बहीण डॉक्टर, भाऊ इंजिनीअर. सुजाता यांना लहान वयातच व्यावसायिक शिक्षणाची दिशा मिळाली. दहावीनंतर त्यांनी पुण्याच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घेतला.

पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश मिळाल्यानंतर मोठी अडचण होती राहण्याची. वसतिगृहाच्या शोधात असताना, त्यांना समितीची माहिती मिळाली. त्यांनी अर्ज केला आणि सुमित्रा सदनमध्ये प्रवेश मिळाला. हाच त्यांच्या आयुष्यातील निर्णायक टप्पा ठरला.

ग्रामीण भागात आणि मराठी माध्यमातून शिक्षण घेतल्यामुळे, इंग्रजी माध्यमातील तांत्रिक अभ्यासक्रम समजून घेणे अत्यंत कठीण होते. अपयश पत्करायचे नाही, या जाणीवेने सुजाता यांना कठोर परिश्रम करायला प्रवृत्त केले. समितीतील शिस्तबद्ध दिनचर्या, योग, चार तासांचे काम आणि कमवा व शिका या सगळ्यांमुळे त्यांना वेळेचे व्यवस्थापन, जबाबदारी आणि आत्मविश्वास मिळाला. सुमित्रा सदनमधील सिनिअर मुली आणि वसतिगृहाचे रेक्टर हे कडक शिस्तीसोबत मायेचा हात देणारे होते. त्यांचा आधार या प्रवासात महत्त्वाचा ठरला.



डिप्लोमानंतर सुजाता यांनी कॉम्प्युटर इंजिनीअरिंग पूर्ण केले. अंतिम वर्षाच्या निकालाआधीच त्यांना सॉफ्टवेअर व्यवसायात भागीदार होण्याची संधी मिळाली. कोणतीही आर्थिक गुंतवणूक न करता, केवळ ज्ञान आणि कौशल्याच्या जोरावर त्यांनी ही भागीदारी स्वीकारली. त्यावेळी त्यांच्याकडे मोठ्या कंपन्यांच्या ऑफर्स होत्या. वडील म्हणाले, 'पैसे मागू नकोस आणि मला पैसे देऊ नकोस, मग तू व्यवसाय करू शकतेस.'

काही अभियंत्यांनी सुरू केलेली ही कंपनी पुढे १८० हून अधिक अभियंत्यांपर्यंत वाढली. या प्रवासात त्यांचे व्यावसायिक भागीदार आणि इतर अनेक मेंटॉर आणि कोच मार्गदर्शक ठरले.

समितीतून मिळालेली शिस्त, मूल्ये आणि मित्रमैत्रिणी याचा प्रभाव त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर आहे. समितीकडून मिळालेल्या संस्कारांचा, शिस्तीचा त्यांना वेळोवेळी उपयोग झाला.

आज सुजाता समाजासाठी विविध पातळ्यांवर समितीसाठी योगदान देत आहेत. जपानी भाषा वर्ग, विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, देणगीदारांना समितीशी जोडणे, शैक्षणिक मदत आणि भारत- जपान दरम्यान संधी निर्माण करणे. त्यांच्या प्रयत्नांमुळे शंभरहून अधिक विद्यार्थ्यांना जपानमध्ये काम किंवा भेट देण्याची संधी मिळाली आहे.

प्रवासाची आवड असलेल्या सुजाता यांनी ३२ हून अधिक देशांना भेटी दिल्या आहेत. त्या METI (Japan Government Organization), IIM Bangalore आणि विविध जपानी शाळांशी संबंधित आहेत. टोकियोमध्ये त्या १०० हून अधिक लहान मुलांचा Toastmasters Club चालवतात. त्यांना २०२१ मध्ये 'Best Woman Performer in Corporate Management' हा पुरस्कार मिळाला असून, Business India Magazine (ऑक्टोबर २०२०) मध्ये त्यांच्यावर लेख प्रसिद्ध झाला आहे.

समितीतील शिस्तबद्ध जीवन, शिक्षणाची जिद्द आणि समाजाशी नाते जपण्याची वृत्ती, या सगळ्यांचा संगम म्हणजे सुजाता कोळेकर यांचा प्रवास. हा प्रवास आजच्या तरुण पिढीसाठी केवळ यशाची कहाणी नाही, तर स्वप्न पाहण्याची आणि ती प्रत्यक्षात उतरवण्याची प्रेरणा आहे.

# उन्मेष युवक महोत्सवातून विद्यार्थ्यांच्या ऊर्जेला दिशा

युवकांच्या ऊर्जेला योग्य दिशा देणारा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारा उन्मेष युवक महोत्सव २०२५- २६ समितीत २२, २३ आणि २४ जानेवारी रोजी साजरा करण्यात आला.

हा युवक महोत्सव डॉ. अच्युत शंकर आपटे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'ऊर्जा' या नावाने सुरू केलेल्या परंपरेचा पुढचा टप्पा होता. ऊर्जेचा उमंग हा दुसरा, उमंगचा उत्कर्ष हा तिसरा आणि यंदाचा "उत्कर्षाचा उन्मेष असा चौथा युवक महोत्सव होता.


महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत प्रभू मानखेडकर, ॲड. पुष्कर पाटील उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून अभिनेत्री मीरा सारंग उपस्थित होत्या. समितीच्या पुण्यातील सर्व वसतिगृहांतून एकूण २५० मुलामुलींनी या महोत्सवात सहभाग नोंदवला. युवकांच्या नेतृत्वगुणांना वाव देत विद्यार्थी विकास केंद्राच्या टीमने उत्कृष्ट नियोजन केले. फेस्टिव्हल इंचार्ज म्हणून प्रणय पाले यांनी जबाबदारी सांभाळली.



## क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धा

महोत्सवात विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. ट्रेझर हंट, ॲसिड रिव्हर, टग ऑफ वॉर, बॉम्ब इन द सिटी अशा गेम्सबरोबरच पथनाट्य, ग्रुप डान्स, ग्रुप गायन, थीम बेस्ड फॅशन शो, काव्यवाचन, वक्तृत्व, वादविवाद, बॉलिवूड डे, ट्रॅडिशनल डे अशा सांस्कृतिक स्पर्धाही झाल्या. यात विद्यार्थ्यांचे गटकार्य, नेतृत्व, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास यांचे दर्शन झाले. बक्षीस वितरण समारंभाला इंद्रजित बाउल उपस्थित होते.

# वर्ल्ड लीडरशिप प्रोग्रॅमसाठी सृष्टी डोईजड हिची निवड



समितीची विद्यार्थिनी सृष्टी डोईजड हिची नुकतीच अमेरिकेच्या हार्वर्ड युनिव्हर्सिटीच्या प्रतिष्ठेच्या वर्ल्ड लीडरशिप प्रोग्रॅमसाठी निवड झाली आहे. सृष्टी मूळची गडचिरोलीची आहे. जगभरातून धोरणनिर्मिती व संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्या युवकांची या अभ्यासक्रमासाठी निवड केली जाते. यावर्षी राज्यातून एकमेव सृष्टीची निवड झाली आहे. ती सध्या पुण्याच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयात शिकत आहे. महिला शेतकऱ्यांचे मानसिक आरोग्य आणि त्यांच्या विविध प्रश्नांवर शाश्वत उपाययोजना करता याव्यात, यासाठी काम करण्याचा मानस असल्याचे सृष्टीने सांगितले. त्यासाठी तिने 'सखी' या मंडेलची निर्मिती केली आहे. तिच्या कामाची दखल घेऊन राज्य सरकारने शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी नेमलेल्या कृतिदलात सृष्टीची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.

# पंचकोश संकल्पनेतून उलगडला मानवी प्रवास

## सुप्रिया केळवकर यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

आजच्या स्पर्धात्मक काळात माणूस बाह्य यश, भौतिक साधने आणि सामाजिक मान्यतेच्या मागे धावत असताना स्वतःच्या अंतर्मनाशी संवाद हरवत चालला आहे. अशा परिस्थितीत भारतीय तत्त्वज्ञानातील पंचकोश संकल्पना आणि समर्थ रामदास स्वामींनी मांडलेले गुणदर्शन हे केवळ आध्यात्मिक नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकासासाठी मार्गदर्शक ठरते. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर यांनी घेतलेले सत्र हे माहितीपुरते मर्यादित न राहता आत्मचिंतन, विवेक आणि मूल्याधिष्ठित जीवनशैलीकडे प्रवृत्त करणारे ठरले. विद्यार्थी साहाय्यक समितीच्या मुलींच्या नवीन वसतिगृहात हे सत्र झाले. यावेळी केळवकर यांनी पंचकोश संकल्पना मांडत अन्नमय कोशापासून आनंदमय कोशापर्यंतचा मानवी प्रवास उलगडून दाखविला. समर्थ रामदास स्वामींनी सांगितलेल्या सात्त्विक, राजस आणि तामस गुणांचे विवेचन सुप्रियाताईंनी केले.



समिती वृत्त

# बेसिक रॉक क्लायंबिंग कोर्समध्ये समितीच्या २७ विद्यार्थ्यांचे यश

## एव्हरेस्टवीर भगवान चवले यांचे मार्गदर्शन

पुण्यातील The Alpinist Mountaineering Institute of Pune यांच्या वतीने ३०, ३१ जानेवारी व १, २ फेब्रुवारी रोजी बेसिक रॉक क्लायंबिंग सर्टिफिकेट कोर्सचे आयोजन केले होते.

या उपक्रमात समितीच्या पुण्यातील वसतिगृहांतून एकूण २० मुली व ७ मुलांनी सहभाग घेतला. या तुकडीचे नेतृत्व प्रणय पाले यांनी केले. दोन वेळा एव्हरेस्ट सर करणारे भगवान चवले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध साहसी उपक्रम पूर्ण केले. त्यामध्ये रॉक क्लायंबिंग, जुमरिंग, माउंटन रॅपलिंग, टेंट पिचिंग, झिपलाइन रिव्हर क्रॉसिंग, सीपीआर तंत्र, स्ट्रेचर मेकिंग, रेस्क्यू ट्रेनिंग तसेच गिर्यारोहणासाठी आवश्यक शारीरिक प्रशिक्षणाचा समावेश होता. याशिवाय टीम गेम्स व कॅम्पफायर नाईटमुळे संघभावना अधिक दृढ झाली.

कोर्सच्या चौथ्या दिवशी घेण्यात आलेल्या परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम गुणांनी यश संपादन केले. समीतीच्या इतिहासात पहिल्यांदाच असा साहसी उपक्रम राबवून त्यात सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले.



मनोगत

# स्वतःकडून समाजाकडे नेणारा अनुभव



अहिल्यानगरमधील स्नेहालय संस्थेच्या ३४ व्या राज्यस्तरीय युवा निर्माण शिबिरामध्ये सहभागी होण्याची संधी मला मिळाली. हे शिबिर माझ्या विचारांना प्रगल्भ बनविणारे, भावनांना जागृत करणारे, ध्येय निश्चित करणारे आणि स्वओळख मिळवून देणारे ठरले.

ता. २१ ते ३० जानेवारी असे दहा दिवसांचे हे शिबिर जीवनाला एक नवीन दिशा देणारे होते. वेगवेगळ्या भागातून आलेल्या आणि समाजाप्रती वेगवेगळी भावना असणाऱ्या युवक- युवतींना 'आत्मशोध आणि समाजभान' या विचारधारेच्या छताखाली आणण्याचे काम या शिबिराने केले.

शिबिरामधील विविध उपक्रम, चर्चा, संवादातून स्वतःमधील क्षमतांची ओळख झाली. एकसंघ राहून एकमेकांना समजून घेऊन एकमताने निर्णय कसा घ्यावा हे समजले. स्वतःकडे आणि समाजाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची शिकवण मिळाली. 'हे विश्वचि माझे घर' या वैश्विक विचाराला या शिबिरामुळे अधिक दृढता आणि बळकटी मिळाली.

दहा दिवसांच्या या शिबिरामध्ये नियोजन आणि शिस्त यांचा सुंदर मिलाफ दिसून आला. शिबिरामुळे मला एक हक्काचा मित्रपरिवार मिळाली.

**मानसी जाधव**, डॉ. आपटे वसतिगृह